दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १६२ वा रविवार दि.०८ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## लाडकी बहिणः आता लाभार्थ्यांची होणार छाणनी



लातूर : सिद्धेश्वर दाताळ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी लातूर जिल्ह्यातून आजवर आलेल्या सुमारे ६ लाख लाभार्थी महिलांच्या अर्जांची लवकरच छाननी करण्यात येणार आहेत. संबंधित महिला खरोखरच योजनेच्या निकषात बसतात का, त्यांना सरकारचा १ हजार ५०० रुपयांपेक्षा जास्त निधी इतर योजनेतून मिळतो का, त्यांच्या घरात चारचाकी वाहन आहे का, घरात कोणी सरकारी नोकरदार आहे का याची फेरपडताळणी करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक महिलांना मिळणा-या निधीला आता कात्री बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वांत जास्त चर्चा झाली ती 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेची. या योजनेमुळे महायुती सरकारला महिलांनी भरभरून मते दिली. त्यामुळे सत्ता स्थापनेनंतर 'लाडक्या बहिणीं' बाबत महायुतीचे सरकार काय निर्णय घेणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. शपथविधी सोहळ्यानंतर राज्याचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लाडकी बहीण योजना' सुरूच राहणार असून १ हजार ५०० ऐवजी २ हजार १०० रुपये देण्यासंदर्भातील निर्णय लवकरच घेऊ, असे सांगितले. लाडकी बहीण योजनेत किती महिला निकषाच्या बाहेर आहेत, याबाबतची फेरपडताळणी केली जाणार आहे, असेही स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांच्या विधानानंतर प्रशासनाकडून आता आजवर आलेल्या अर्जांची फेरपडताळणी करण्याची प्राथमिक तयारी सुरू झाली आहे.

लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांनी संजय गांधी निराधार योजना किंवा सरकारच्या इतर योजनांमधून महिलांना निधी मिळतो आहे का याची प्रामुख्याने पडताळणी केली जाणार आहे. त्यानंतर सरकारचे सूचनेनुसार ज्यांच्या घरात चारचाकी वाहन आहे, लाभार्थी महिलेचे पती सरकारी नोकरदार आहेत का यासह इतर बाबींची पडताळणी करून निकषात न बसणा-या महिलांचा निधी बंद केला जाण्याची शक्यता आहे.

## प्रार्थनास्थळ कायदा वैधता; १२ रोजी होणार सुनावणी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था १२ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालय प्रार्थनास्थळ कायदा (१९९१) च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणा-या याचिकांवर सुनावणी करणार आहे. यापूर्वी ही सुनावणी ५ डिसेंबरला सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार होती. मात्र, सुनावणीपूर्वीच खंडपीठ उठले.

आता १२ डिसेंबर रोजी मुख्य न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या विशेष खंडपीठासमोर दुपारी ३.३० वाजता या प्रकरणावर सुनावणी होणार आहे.

हा कायदा १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात असल्याप्रमाणे धार्मिक स्थळांना त्यांचे स्वरूप बदलण्यासाठी खटले भरण्यापासून प्रतिबंधित करतो. यामुळे न्यायिक उपायांचा अधिकार हिरावून घेतला जातो, जो संविधानाच्या मूलभूत रचनेच्या विरुद्ध आहे, असा युक्तिवाद याचिकांमध्ये करण्यात आला आहे. कायद्याच्या कलम २, ३, ४ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्यात आले आहे. युक्तिवाद असा आहे की ते हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख प्रार्थनास्थळे आणि तीर्थक्षेत्रे पुन्हा ताब्यात घेण्यास प्रतिबंधित करते. तर मुस्लिमांच्या वक्फ कायद्याचे कलम १०७ असे करण्यास परवानगी देते. हे संविधानात अंतर्भूत धर्मनिरपेक्षता आणि कायद्याचे राज्य या तत्त्वांचे उल्लंघन करते.



जमियत उलेमा-ए-हिंदने या याचिकांविरोधात याचिका दाखल केली आहे. जमियतचा असा युक्तिवाद आहे की, या कायद्याविरुद्धच्या याचिकांवर विचार केल्यास देशभरातील मशिदींविरुद्ध खटल्यांचा पूर येईल. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आणि ज्ञानवापी मशिदीची देखभाल करणा-या अंजुमन व्यवस्था मशीद व्यवस्थापन समितीनेही या याचिका फेटाळण्याची मागणी केली आहे.

## अमित देशमुख यांचा मातंग समाजातर्फे सत्कार



लातूर: लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून सलग चवथ्यांदा विजयी झाल्याबद्दल माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचा बाभळगाव निवासस्थानी मातंग समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य माधव गादेकर, पत्रकार अशोक देडे, आनंद वैरागे, माजी नगरसेवक सुनील बसपुरे, राज क्षिरसागर, मोहन सुरवसे, डॉ. दिनेश नवगिरे, श्रीमंत गायकवाड, ऍड अंगद गायकवाड, माजी नगरसेविका केशरबाई महापुरे, सुरेश चव्हाण, अंगद वाघमारे, कल्याण शाहीर, नागनाथ डोंगरे, महेंद्र घोडके आदिसह मातंग समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी अमित देशमुख यांनी शहरासह जिल्हाभरातील मातंग समाजाचे प्रश्न जाणून घेऊन ते सोडवण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे बजेट वाढवून घेण्यासाठी आणि आरक्षणाचा अ ब क ड प्रवर्ग लागू होण्यासाठी प्रत्यनशील राहू, अशी ग्वाही दिली. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन रवींद्र काळे, धाराशिव जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अश्लेष मोरे आदी उपस्थित होते.

## सशस्त्र सेना ध्वजदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा गौरव

### सैनिकांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रम, योजनांसाठी होतो निधीचा वापर

लातूर :- लातूर जिल्हा प्रशासनाने गतवर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी करीत मराठवाड्यात प्रथम, तर राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. या कामगिरीबद्दल आज, सशस्त्र सेना ध्वजदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण मंडळाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे यांच्यासह जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) यांना राजभवन येथे गौरविण्यात आले. फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ वेस्टर्न नेव्हल कमांड व्हाईस डमिरल संजय जे सिंग, व्हीएसएम जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल पवन चड्ढा, एअर व्हाइस मार्शल रजत मोहन, माजी सैनिक विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा यावेळी उपस्थित होत्या.

देशाच्या सुरक्षिततेसाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या सैन्य दलातील जवान, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध उपक्रम, योजना राबविण्यासाठी दरवर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित केला जातो. सर्वसामान्य नागरिकांना सैन्यदलाप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनातून मिळते. माजी सैनिकांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी ७ डिसेंबर हा ध्वजदिन म्हणून पाळण्यात येतो. यानिमित्ताने ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित केला जातो. देशाच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडी-अडचणी दूर करून त्यांचे दैनंदिन जीवन सुसाह्य व्हावे, यासाठी त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा विनियोग केला जातो. लातूर जिल्ह्याला सुमारे ४१ लाख रुपयांचे उद्दिष्ट असतानाही 'संकल्प हीच सिद्धी' या संकलपनेतून १ कोटी १२ लाख रुपये ध्वजदिन निधी संकलित करण्यात आला.




सैनिकांसाठीच्या उपक्रमाविषयी झालेला गौरव सर्वाधिक आनंददायी : जिल्हाधिकारी

देशावर येणाऱ्या प्रत्येक संकटाचा धाडसाने सामना करून आपले रक्षण करणाऱ्या सैन्य दलाप्रती प्रत्येक भारतीयाच्या मनात आदराची भावना आहे. सशस्त्र सेना ध्वजदिन निधीच्या माध्यमातून सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी योगदान देण्याचा प्रयत्न लातूर जिल्हा प्रशासनातील प्रत्येक घटकाने केला. लातूर जिल्हा प्रशासनाच्या या योगदानाची दखल घेवून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज जिल्हा प्रशासनाची प्रतिनिधी म्हणून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र स्वीकारले. सैनिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल झालेला हा गौरव सर्वाधिक आनंददायी असल्याची भावना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केली.

## वरवटे कुटुंबाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन



लातूर / प्रतिनिधी :- समसापुर तालुका रेणापूर येथील रेणा साखर कारखान्याचे माजी संचालक अच्युतराव वरवटे यांचे चिरंजीव लक्ष्मण अच्युतराव वरवटे यांचे दोन दिवसापूर्वी अपघाताने निधन झाले होते त्याबद्दल शनीवारी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी समसापुर तालुका रेणापूर येथे वरवटे यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले यावेळी दिवंगत लक्ष्मण वरवटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले यावेळी माजी आमदार अँड त्रिंबक भिसे रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जे राव मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,रेणापूर बाजार समितीचे माजी सभापती दिलीप पाटील, लालासाहेब चव्हाण, माणिक सोमवंशी अनुप शेळके,हरिराम कुलकर्णी संभाजी रेड्डी, बाळासाहेब जाधव, बालाजी कदम, समसापुरचे सरपंच बडीदे, अच्युतराव वरवटे, वरवटे कुटुंब ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## पौष्टिक ड्रायफ्रुट १५ टक्क्यांनी महागले

लातूर : प्रतिनिधी शरीराची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपयुक्त असलेल्या पौष्टीक ड्रायफ्रुटच्या मागणीत गतवर्षाच्या तुलनेत १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली असल्याची माहिती किरकोळ व्यापारी सादिक बागवान यांनी दिली. वाढत्या थंडीमुळे ड्रायफ्रुटची मागणी वाढली तसे दरही वाढले आहेत. शहरातील किरकोळ बाजारात काही दिवसापांसून काजू, बदाम, अक्रोडच्या मागणीत वाढ झाली आहे.

सध्या बाजारात कोल्हापूर, मंगळुरु, गोवा, केरळ येथून काजूची आवक होत आहे तर बदामाची आवक अमेरिकेतील कॅलिफोर्नियातून होत आहे. तसेच इराणमधील मॉमेरोन जातीच्या बदामाची आवक होत आहे. काजूच्या नवीन हंगामाची सुरुवात झाली असून त्याला मागणीही चांगली आहे. त्याच बरोबर अक्रोडची आवक दक्षिण अमेरिकेतील चिलीतून होत आहे. अमेरिकेतून अक्रोडची आवक होत असली तरी चिलीच्या अक्रोडची प्रतवारीही चांगली आहे.

पुढील काही दिवसांत काश्मीरमधील अक्रोडचा हंगाम सुरु होईल. गतवर्षाप्रमाणे थंडीत ड्रायफ्रुटच्या मागणीत वाढ होते. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यापर्यंत ड्रायफ्रुटला चांगली मागणी राहते, असेही त्यांनी सांगितले. हिवाळ्यात आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायामाबरोबरच आहारवरही लक्ष केंद्रीत केले जाते. हिवाळा या मोसमात जीममध्ये जाणा-यांची संख्या वाढत असते. व्यायामासोबत पोषक असा आहार घेण्यासाठी डिंक, शेंगदाणे आदींपासून तयार केलेले लाडूंचा वापरही मोठया प्रमाणात केला जातो. हे पदार्थ बनविण्यासाठी ड्रायफ्रुट वापरले जात असल्याने काजू, बदाम, पिस्ता, खारिक, खोबरे आदींना प्रचंड मागणी असते. गतवर्षाच्या तूलनेत यंदा थंडीची लाट वाढत जात आहे.

## महानगरपालीकेने सिटी बस सेवा स्मार्ट कार्ड देण्यासाठी केंद्राची संख्या वाढवावी माजी मंत्री आमदार अमित देशमुख

लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहरातील महिलांसाठी मोफत सिटीबस सेवा पुढे चालूच राहणार आहे, त्यामुळे महापालिका प्रशासनाने महिलांना स्मार्ट कार्ड देण्यासाठी प्रत्येक प्रभागात केंद्र सुरू करावीत, अशा सूचना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी मनपा आयुक्त आणि प्रशासनाला केली आहे. लातूर महापालिकेने काँग्रेस पक्षाच्या पुढाकारातून तीन वर्षांपूर्वी महिलांसाठी मोफत सिटी बस सेवा सुरु केलेली आहे, लातूर महापालिका सिटीबस मधून महिलांना मोफत प्रवास देणारी देशातील पहिली आणि एकमेव महापालिका ठरलेले आहे, तीन वर्षांपासून आजवर ही सेवा निरंतरपणे चालू असून असंख्य महिलांनी या सेवेचा लाभ घेतला आहे, या सेवेचा लाभ शहरातील महिलांना पुढेही मिळत राहावी म्हणून महापालिकेने स्मार्ट कार्ड अनिवार्य केले आहे, स्मार्ट कार्ड (पास) असलेल्या महीलानाच १ जानेवारी पासून सिटीबस मधून मोफत प्रवास करता येणार आहे. हे कार्ड मिळण्यासाठी गंजगोलाई व क्रीडा संकुल नजीकच्या बस स्टॉपवर केंद्र सुरू करण्यात येत आहेत. या ठिकाणी आधार कार्ड देऊन स्मार्टकार्डसाठी रजिष्ट्रेशन सुवीधा करण्यात आली आहे. मोफत सिटीबस प्रवास स्मार्ट कार्डसाठी दोनच केंद्र ठेवल्यामुळे गर्दी होऊन महीलाची गैरसोय होणार आहे त्यामुळे सदरील कार्डसाठी प्रभागनिहाय केंद्र सुरू करावेत अशा सुचना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी महापालीका आयुक्त व प्रशासनाला केल्या आहेत.



## संपादकीय....

# गंभीर इशारा

शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांच्यावर बुधवारी गोळीबार करण्यात आला. भाविकांचे श्रद्धास्थान असणार्या अमृतसरच्या जगप्रसिद्ध सुवर्ण मंदिराच्या गेटवर त्यांच्यावर हा हल्ला केला गेला. बादल यांच्या सुदैवाने ते हल्ल्यातून बचावले. एक गोष्ट या घटनेतून अधोरेखित मात्र झाली, ती म्हणजे शिखांसाठी वेगळे खलिस्तानची जी मागणी काही देशविघातक शक्तींकडून केली जाते आहे ती केवळ वर्तमानपत्रांतील मथळे आणि वाहिन्यांवरील ब्रेकिंग न्यूजच्या पलीकडे गेली असून हा फुटीरतावाद पुन्हा एकदा डोके वर काढून उभा राहू पाहतो आहे.

पंजाब पोलिसांच्या साध्या वेषातील एका अधिकार्याने सतर्कता बाळगत वेळीच हालचाल केल्यामुळे बादल यांचे प्राण बचावले. तरीही पाकिस्तानच्या सीमेलगत असणार्या या राज्यात सुरक्षेच्या संदर्भात जी अधिक सतर्कता बाळगली जाणे आवश्यक आहे तशी ती नसल्याची त्रुटीही समोर आली आहे. २००७ ते २०१७ या काळात पंजाबमध्ये बादल यांच्या पक्षाचे सरकार होते. त्यावेळी बाबा राम रहिमच्या संदर्भात श्री अकाल तख्तच्या जथ्थेदारांवर दबाव आणल्याचा आरोप बादल यांच्यावर होता. इतरही काही धार्मिकदृष्ट्या अप्रिय अशा गोष्टी त्या काळात पंजाबमध्ये घडल्याचा आरोप होता. श्री अकाल तख्त साहेबमध्ये सुखबीर यांचे पिता व पंजाबचे दिग्गज नेते दिवंगत प्रकाशसिंग बादल यांना पूर्वी दिला गेलेला सन्मान मागे घेण्याचा निर्णय घेतला गेला. तसेच सुखबीर यांना धार्मिक सेवा बजावण्याची शिक्षा करण्यात आली. त्यानुसार ते सेवा करण्यासाठी आले असताना त्यांच्यावर हल्ला झाला.

इतर संवेदनशील धार्मिक ठिकाणी ज्याप्रमाणे कडेकोट सुरक्षा तैनात असते तशीच ती सुवर्ण मंदिरातही आहे. मात्र, ती बाहेरच्या बाजूला आहे. अन्य ठिकाणी भाविकांना आत सोडताना जी तांत्रिक पद्धतीने तपासणी केली जाते तशी येथे होत नाही. सरकार श्रद्धेच्या विषयात अनावश्यक हस्तक्षेप करत नाही, ही चांगली बाब आहे. तथापि, याचाच फायदा घेत पूर्वाश्रमीचा दहशतवादी असलेल्या व्यक्तीने सुखबीर यांच्यावर गोळी झाडण्याचे धाडस केले. सुखबीर हे कोणी सामान्य भाविकासारखे तेथे गेले नव्हते. त्यांचा इतिहास सर्वज्ञात असताना त्यांच्या सुरक्षेची विशेष दक्षता घेतली जाणे आवश्यक होते. शस्त्र आत गेलेच नसते तर पुढे गोळीबाराची घटनाही घडली नसती. हल्लेखोराने एकट्याने आणि तत्कालीक किंवा जुन्या कोणत्या रागातून हे कृत्य केले की यामागे कोणती संघटना होती व त्यांचा सुनियोजित कट होता ज्याद्वारे त्यांना केवळ पंजाबच नाही तर संपूर्ण भारताला संदेश देण्याचा इरादा होता या बाबी लवकरच स्पष्ट होतील. एकमात्र खरे की कोणत्याही कट्टर विचारसरणीने प्रेरित होऊन कोणते धोकादायक कृत्य करताना धर्माचाच आधार घेतला जातो किंवा धर्माच्या पडद्याआड जात ती कृती केली जाते याची पुन्हा एकदा प्रचिती आहे. सुखबीर यांना धार्मिक शिक्षा सुनावली असल्यामुळे एकप्रकारे जनभावना आता त्यांना प्रतिकूल असेल असे गृहीत धरून याच संधीचा लाभ घेत त्यांना संपवण्याचा प्रयत्न केला गेला, हे स्पष्ट दिसते आहे.

हल्लेखोराचा पूर्वेतिहास पाहता तो विभाजनवादी संघटनेत सक्रिय होता. तो पाकिस्तानातही जाऊन आला असून विविध गुन्ह्यांखाली त्याला कारावासही भोगावा लागला आहे. गेल्या वर्षभरापासून भारतात आणि भारताबाहेर ज्या खलिस्तानवादी वृत्तींनी पुन्हा डोके वर काढले आहे त्यांच्या कारवायांमध्येही तो सहभागी होता ही माहितीही समोर आली आहे. विविध देशांतील भारतीय दूतावासांना या शक्तींनी लक्ष्य केले तसेच भारतातही त्यांनी पोलीस यंत्रणेला थेट आव्हान देण्याच्या घटना अलीकडच्या काळात घडल्या. कॅनडात काय होते आहे ते सगळ्यांनी पाहिले आहे. पंजाबमधील व्यावसायिक शीख बांधवांनी याबद्दल चिंता व्यक्त केली होती. कारण अशी अशांतता निर्माण झाली की त्याचा सगळ्यांत पहिला फटका व्यवसायाला व पर्यायाने अर्थकारणाला बसत असतो. पंजाबमध्ये ८०-९० च्या दशकात जी स्थिती होती ती भयंकर होती.

नव्वदच्या दशकाच्या मध्यापर्यंत ती बर्यापैकी आटोक्यात आणली गेली. मात्र, तोपर्यंत राज्याचे आणि तेथील युवा पिढीचे व अनेक कुटुंबांचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले होते. त्या कालखंडात जन्म झाला नसलेल्या आजच्या पिढीला याचे सखोल ज्ञान असणे शक्यच नाही आणि केवळ वाचनातून जरी त्या काळातील माहिती त्यांनी मिळवली असली, तरी त्या वास्तवाची दाहकता त्यांच्यापर्यंत तेवढी गंभीरपणे पोहोचली असेलच असेही नाही. या पिढीवरच अलीकडे नव्याने उदयाला आलेल्या अमृतपाल सिंग आदी घटकांची मदार आहे. पंजाबला अंमलीपदार्थांनी विळखा घातला आहेच आणि त्यात भरकटलेल्या पिढीच्या नशेखोरीला ग्लॅमर देण्याचा प्रयत्नही झाला आहे. समाज माध्यमांच्या मदतीने चुकीच्या माहितीचा प्रसार आणि भारतीय संस्था आणि व्यक्तींना देशात आणि देशाबाहेर लक्ष्य करण्याची स्टंटबाजी करून या पिढीला भुलवण्याचेच काम होते आहे. दिल्ली आणि अन्य महत्त्वाच्या ठिकाणांच्या भिंती घोषणांनी रंगवून आणि परदेशात बसून भारताला तोडण्याची भाषा करणारे व्हिडिओही प्रसारित केले जात आहेत. हा सगळा प्रकार आता अत्यंत गांभीर्याने मात्र संयतपणे आणि तेवढ्याच धोरणीपणाने हाताळण्याची गरज आहे.

# ग्रंथवेडा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर..!

बाबासाहेब भीमराव रामजी आंबेडकर यांना आपण दलितांचा सूर्य, कायदे पंडित, बोधिसत्व, मानवतेचे पुजारी, समतेचे पुरस्कर्ते, भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न म्हणूनही त्यांचा मोठा नाव लैंगिक आहे. परंतु यापेक्षाही बाबा साहेब आंबेडकर हे महामानव एक ग्रंथ वेडे होत, ते त्यांना वेगवेगळ्या ग्रंथाचे वेड होते. त्यांची ग्रंथावर अपार प्रेम होते. त्यांनी अनेक ग्रंथातील ज्ञान आत्मसात केले होते .ग्रंथ हेच माझे गुरु अशी त्यांची धारणा होती. मुंबई येथे दादर विभागात 'राजगृह' नावाचे बाबासाहेबांचे घर आहे. हे घर म्हणजे अनेक विविध ग्रंथाचे भंडारच आहे. ही ग्रंथ संपत्ती मिळवताना बाबासाहेबांना अतिशय कष्ट पडले त्यासाठी ते प्रसंगी उपाशी देखील राहत ग्रंथासाठी त्यांचे मन तळमळे. बाबासाहेब एका ठिकाणी म्हणतात जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एका रुपयाची भाकरी घ्या, आणि दुसऱ्या रुपयाची पुस्तक घ्या, भाकरी तुम्हाला जगवेल तर, पुस्तक कसे जगावे ते शिकवेल... अशाप्रकारे बाबासाहेबांचं विद्या विषयी ग्रंथावर विशेष असे प्रेम होतं. परदेशात असताना-बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी परदेशात असतानाची गोष्ट. त्यावेळी त्यांच्याजवळ पुस्तक घेण्यासाठी पुरेसे पैसे नसत पुस्तकाशिवाय अभ्यास कसा होणार? म्हणून त्यांनी एक मार्ग अवलंबिला होता. ते दररोज ग्रंथालयात जात तेथील पुस्तके मिळवून वाचित अभ्यास करीत जितका वेळ ग्रंथालय उघडे राहायचे तोपर्यंत ते तिथेच ग्रंथ वाचित बसायचे ग्रंथ वाचता वाचता त्यांना भूक लागली तेव्हा ते आपल्याजवळ पाव ठेवायचे भूक लागली म्हणजे गुपचूप कोणालाही न दिसेल असे ग्रंथपालाची नजर चुकून पावची तुकडे खायचे. मात्र एके दिवशी ग्रंथपालाने बाबासाहेबांना पाव खाताना पाहिले. ग्रंथपालाला थोडे आश्चर्य वाटले नंतर ग्रंथपालाने त्यांना जवळ बोलावले ग्रंथपाल त्यांना म्हणाला, मिस्टर आंबेडकर,हे ग्रंथालय आहे .ते समोरचे बोर्ड बघा. समोरच्या भिंतीवरचा सूचनावजा बोर्ड होता. येथे काही खाऊ नये, घाण करू नये, स्वच्छता राखा. बाबासाहेबांनी भिंतीवरचा तो फलक पाहिला, वाचला आणि मान खाली घातली, हा इथला नियम तुम्ही मोडला आहे. अपराध केला आहे. तुम्हाला शिक्षा करावी लागेल. समजलात ? ग्रंथपालाने सांगितले. क्षमा करा. यापुढे मी सूचनेचे पालन करीन. उपाशी राहून येथे वाचत बसेल, मग तर झाले ? बाबासाहेब म्हणाले. अपराध करणाऱ्याला क्षमा करता येत नाही ग्रंथपाल. बाबासाहेब म्हणाले शिक्षा करा पण एक विनंती आहे . ग्रंथपाल कोणती? ग्रंथपालाने विचारले.

माझ्यासाठी हे ग्रंथालय बंद करू नका. ग्रंथाशिवाय मी जगू शकत नाही. म्हणून मला या व्यतिरिक्त कोणतीही शिक्षा द्या. मी ती भोगायला तयार आहे. बाबासाहेबांनी ग्रंथपालास सांगितले. ग्रंथावरील हे अजोड प्रेम पाहून तो गोरा ग्रंथपाल मनातून सुखावला. बाबासाहेबांच्या ग्रंथाच्या वेडाने ग्रंथपाल भरून गेला. म्हणाला, मिस्टर आंबेडकर, तुम्ही उद्यापासून माझ्याबरोबर जेवायचे ही तुम्हाला शिक्षा आहे. मी तुमचे जेवण दररोज आणत जाईन.

गोऱ्या ग्रंथपालाने सुनावलेली शिक्षा एकूण बाबासाहेबांची डोळे पानावले ते पुढे सरसावले आणि त्या ग्रंथपालाचे हात आपल्या हातात घेऊन बाबासाहेबांनी कृतज्ञता व्यक्त केली .असा हा ग्रंथ वेडा डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाचा माणूस आपलं तमाम भारतीयांचा आदर्श असायला पाहिजे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या विचाराला व कार्याला माझे कोटी कोटी त्रिवार अभिवादन...

*********

पत्रकार- सिद्धार्थ तायडे
मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा, जि, बुलढाणा
मो. नं.९३०९७६७३८८

# बांगलादेशाने अल्पसंख्याकांवरील हल्ले थांबवावे अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

बांगलादेशात हिंदूसह संपूर्ण अल्पसंख्याक समाज दहशतीच्या वातावरणात वावरत आहे.कारण तीथे शेख हसीना सरकार होती तोपर्यंत संपूर्ण समाज व बांगलादेश सुरक्षित होता.परंतु शेख हसीना यांचा तख्तापलट करण्यासाठी बांगलादेशातील अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार महम्मद युनूसने संपूर्ण हद्दीपार केल्या व बांगलादेशाला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले व युनूसने बांग्लादेश काबीज केला.यानंरत युनुस सरकार स्थापन झाली व युनुस सरकारने बांगलादेशाला कट्टरतेकडे वळविण्याचे शडयंत्र रचले आणि बांग्लादेशात कट्टरतेकडे बीज रोवले. त्यामुळे आज तेथील हिंदू सह संपुर्ण अल्पसंख्याक समाज दहशतीच्या वातावरणात जगत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यावर संयुक्त राष्ट्र संघ, अमेरिका, रशिया,ब्रिटन यांनी हस्तक्षेप करून अल्पसंख्याक समाजावर होणारा अत्याचार थांबविला पाहिजे.युनूस हा पाकिस्तानचा मोहरा आहे त्यामुळे तो पाकिस्तानच्या इशाऱ्यावर नाचत आहे. परंतु युनूस सरकारने पाकिस्तानचा पुर्ण अभ्यास केलेला दिसत नाही.कारण आज पाकिस्तान स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झाली आणि भारतही स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झालीत म्हणजे दोघेही बरोबरीने स्वतंत्र झाले.परंतु पाकिस्तान आजही रक्ताच्या लाथोळ्यानी माखलेला व भिकेला लागलेला देश आहे त्याठिकाणीच लोकशाही फक्त नावालाच आहे.तेथील संपूर्ण कारभार आतंकवादी, दहशतवादी व कट्टरपंथी यांच्या हातात आहे.त्यामुळे आजपर्यंत पाकिस्तानचा विकास होवू शकला नाही आणि होणारही नाही. कारण पाकिस्तान आतंकवादी संघटनेचे माहेरघर आहे.त्यामुळे सर्वसामान्य व अल्पसंख्याकांचे आजही हालबेहाल होत आहे.तीच परिस्थितीत आज पाकिस्तान बांग्यादेशात करण्याच्या तयारीत आहे आणि त्या पध्दतीने कट्टरवादाचे जाळे विणने सुरू आहे. यावर संयुक्त राष्ट्र संघ, अमेरिका, ब्रिटन, रशिया यांनी ताबडतोब हस्तक्षेप करून अल्पसंख्याकावर होणारे अत्याचार थांबवावे.कारण हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्दा आहे. बांगलादेशातील कट्टरतावाद हे पाकिस्तानचे बिज आहे.कारण बांगलादेशाच्या मार्फत भारतात आतंकवादी कारवाया सहज करता याव्यात या उद्देशाने पाकिस्तान आपली चाल खेळतांना दिसत आहे.यावर आंतरराष्ट्रीय समुदायाने ताबडतोब अंकुश लावावा अन्यथा भारताकडून कठोर पाऊल उचलले जाऊ शकते यालाही नाकारता येत नाही.जगात सध्या धार्मिक घडी बिघडत चाललेली आहे.मस्टरडॅमपासून पॅरिस पर्यंत आणि लंडन ते न्युयॉर्क पर्यंत स्थलांतरितांचे हिंसक जमाव सध्या सभ्यतेवर हल्ले चढवत आहेत.बांग्लादेशात अशाच हिंसेने थैमान घातल्याचे दिसून येते.बांग्लादेशातील हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार नोबेल विजेते मोहम्मद युनूस ढाक्यात आल्यापासून त्या देशात फाळणीनंतरचा मोठा हिंसाचार उफाळला आहे.गेल्या चार महिन्यांपासून हिंदू आणि अल्पसंख्य समुदायाच्या काही प्रमुख नेत्यांना गजाआड करण्यात आले आहे व कट्टरतावाद प्रस्थापित करण्यासाठी अल्पसंख्यांक समूदायांवर अत्यंत घृणास्पद अत्याचार होत आहे.यामुळे तीथे हिंसेचे वातावरण निर्माण झाले असून अल्पसंख्याक लोकांचा जीव धोक्यात येत आहे.कट्टरपंथी उपद्रवी जाळपोळ,खुनखराबा,लुटपाट, अत्याचार अशा भयावह घटनांना युनूस सरकार सहकार्य करीत आहे.यामुळे सध्या अल्पसंख्याकांच्या बाबतीत अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे.तेथील हिंसाचार पहाता हिंदू सह अनेक अल्पसंख्याक समुदाय तेथुन पलायन करतांना दिसतात. बांगलादेशमधील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन युनिटी काउन्सिल ने दिलेल्या माहितीनुसार पाच ऑगस्ट पासून आतापर्यंत हिंदूसह अल्पसंख्याकावर २ हजारपेक्षा जास्त हल्ले झाल्याचे सांगितले जाते.यावरून स्पष्ट होते की अल्पसंख्याक समाज असुरक्षित आहे.याची खबरदारी अमेरिका, ब्रिटन, रशिया आणि संयुक्त राष्ट्र संघाने घ्यावी.कारण अनेक धर्मांचे, पंथाचे, जातीचे आणि समाजाचे अल्पसंख्याक विदेशी नागरिक बांगलादेशात रहातात. त्यामुळे बांगलादेशातील हिंसाचार व अत्याचार रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्रासह अन्य देशांनी योग्य पाऊल उचलले पाहिजे.सोबतच बांगलादेशातील अराजकता पहाता भारत सरकारने कुटणितीच्या माध्यमातून बांगलादेशावर दबाव तंत्राचा वापर करून त्याला योग्य जागा दाखविली पाहिजे. कारण भारताने बांगलादेशाला स्वतंत्र करून दिले, आर्थिक सहाय्य, सैन्य मदत, आपात्कालीन मदत करून शेवटपर्यंत सहकार्याची भूमिका भारताने बजावली.भारताने बांगलादेशाला पाकिस्तान पासून वेगळे करून चांगले जीवन जगण्याची संधी दिली.परंतु आज मोहम्मद युनूसच्या माध्यमातून बांगलादेशने पाकिस्तानचे पाय चाटायला सुरुवात केली आहे.ही बाब भारत कदापि सहन करणार नाही. आज ज्या सापाला दुध पाजून मोठे केले तोच साप आज भारताला डंक मारायला निघाला आहे.परंतु आताही वेळ गेलेली नाही युनूस सरकारने आतातरी सुधारून जावे अन्यथा पाकिस्तान सारखे हालबेहाल होतील व रक्ताच्या लाथोळ्यात गुरफटून मारल्या जाईल.भारत शांती प्रिय देश आहे त्याच्या वाट्याला जर बांगलादेश गेला तर ना घर का ना घाट का अशी गंभीर परिस्थिती बांगलादेशची भारत करेल.त्यामुळे मोहम्मद युनूस सरकारने आंतरराष्ट्रीय दबाव येण्याच्या अगोदर हिंसेचे थैमान रोखुन अल्पसंख्याक समाजाला सहकार्य करावे व ताबडतोब शांतता प्रस्थापित करावी.अन्यथा बांगलादेशाला त्याची जागा भारत अवश्य दाखवेल.पाकिस्तान आणि बांगलादेश यांची जवळीक पहाता भारताला सतर्क रहाने गरजेचे आहे कारण पाकिस्तान बांगलादेश मार्ग संयुक्तपणे दहशतवादी कारवाया करू शकतात.त्यामुळे पाकिस्तान व बांगलादेशच्या मुसक्या आवळण्याची सुध्दा वेळ आली आहे.जय हिंद!

***************

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# खरी आव्हाने आता सुरु

राज्यात शिक्षण, पर्यावरण, औद्योगिक, सामाजिक क्षेत्रांसह अनेक पातळीवर आव्हाने दिसतात. मुख्यत्वेकरून आर्थिक विकास घडवून आणताना विकासाला चालना देणारा निधी कसा उपलब्ध करता येईल, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

आता महाराष्ट्राचा जो कौल आहे आणि ज्या उत्साह व आत्मविश्वासानं हे सरकार स्थापन झालं आहे, त्यामुळं केंद्रातील सरकार डळमळीत करू शकणार्या शक्तींनाही वचक बसेल. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, ज्या पद्धतीनं शपथविधी समारंभ पार पडला तो एक सिग्नल आहे की, देवेंद्र फडणवीस हे आता राष्ट्रीय पातळीवरचे नेते म्हणून उदयास येताहेत. हा शपथविधी केवळ एका राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा नव्हता. भले ते राज्य महाराष्ट्रासारखं मोठं,



महत्त्वाचं, देशावर प्रभाव असलेलं असेल, पण हा सिग्नल आहे की देवेंद्र फडणवीस यांची वाटचाल आता राष्ट्रीय पातळीवरचा नेता अशी सुरू झाली आहे.

शपथविधीला स्वतः पंतप्रधान, केंद्रीय मंत्रिमंडळातील टॉप तीन मानले जाणारे नेते, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह होते, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन होत्या, गृहमंत्री अमित शहा होते, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा होते, चंद्राबाबू नायडू होते, नितीशकुमार होते, आंध्र प्रदेशात चंद्राबाबूसोबत युतीत असणार्या पक्षाचे नेते पवन कल्याण होते. याप्रकारे अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रातील पंतप्रधानांसह सर्व महत्त्वाचे मंत्री उपस्थित राहात असतील, तर लोकशाहीतील तो एक सिग्नलच आहे. जे घडतं आहे त्याला ऐतिहासिक स्थान आहे. त्याला मी म्हणतो आहे की, हा देवेंद्र फडणवीस यांचा राष्ट्रीय पातळीवरचा नेता म्हणून उदय आहे.

असं असलं तरी हे सरकार बनवण्यासाठी १२ दिवस गेले हे काहीसं अनिष्ट झालं. २३ नोव्हेंबर रोजी लोकांनी कौल स्पष्ट दिला होता. पण मुख्यमंत्री कोण, उपमुख्यमंत्री कोण, खाती कोणती कुणाला मिळावीत, मागण्या काय आहेत त्यावरून चर्चा झाली. यासाठी झालेला विलंब टाळता आला असता. पण आता ही आव्हानं संपली आहेत. खरी आव्हानं आता सुरू झाली आहेत. एक तर गोष्ट निश्चित आहे आणि ती कोणा राजकीय पक्षाशी संबंधित नाही की, गेला काही काळ विकासाच्या अनेक निर्देशांकांवर महाराष्ट्र मागे पडत होता. त्यामुळं पहिलं काम म्हणजे महाराष्ट्राच्या विकासाला गती देण्याचं आहे. महाराष्ट्राचं देशातील स्थान सर्वांत विकसित राज्य, नव्हे नव्हे देशाला विकसित करणारं राज्य असं असायला हवं. मी याला मुख्य आव्हान म्हणतो. कारण आता एक स्थिर सरकार, दूरदृष्टी ठेवून आखलेल्या योजना आणि सरकारी नोकरशाही यंत्रणेला गतिमान करून नेतृत्वाकडून या योजनांची पारदर्शक व काटेकोर अंमलबजावणी या माध्यमातून विकासाला वेग येणे गरजेचे आहे.

विकासाला गती देण्यामधील मुख्य आव्हान युवापिढीला रोजगार मिळवून देणं आणि त्याच वेळी एआय, सेमीकंडक्टर यांसह जगामध्ये येणार्या सर्व अत्याधुनिकतेसाठी महाराष्ट्रातील नवी पिढी तयार करणं. यासाठी महाराष्ट्रातील शिक्षणपद्धती वर्ल्डक्लास म्हणजेच जागतिक दर्जाची असायला हवी. याखेरीज पर्यावरण ही समस्या जागतिक असली तरी पण त्याची महाराष्ट्रातील पावलं पर्यावरणाला अनुकूल असायला हवीत. उदाहरणार्थ, २०१४ ते २०१९ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी 'जलयुक्त शिवार' ही योजना हाती घेतली होती. या योजनेबद्दल पक्षीय राजकारणातून ज्याला जे म्हणायचं ते म्हणू द्या. पण पर्यावरण आणि पाणी व जमिनीचं संवर्धन याला ती योजना, ती संकल्पना अतिशय महत्त्वाची होती. आता मुख्यमंत्रिपदाची सूत्रे पुन्हा हाती आल्यावर शाश्वत विकास किंवा सस्टेनेबल डेव्हलपमेंटला गती देणारे कार्यक्रम त्यांनी राबवायला हवेत.

थेट विदेशी गुंतवणूक किंवा एफडीआय आणण्यामध्ये महाराष्ट्र आजही देशात पहिल्या स्थानी आहे. त्याची मुख्य कारणं महाराष्ट्राकडे आधीपासून असणारा बेस किंवा पाय हे आहे. आता त्याला नवी चालना देणं गरजेचं आहे. उदाहरणार्थ, सेमीकंडक्टर इंडस्ट्री किंवा युवापिढीचे कौशल्य वाढवण्याच्या योजना हे शिक्षणपद्धतीत आणावं लागेल. शाळा पातळीपासून जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम बनले पाहिजेत. मुख्य म्हणजे नवं संशोधन, नवी बुद्धी यांना चालना देणारी शिक्षणपद्धती. मुख्य म्हणण्याचं कारण की, कोणाही युवकाला तू आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर कसा उभा राहू शकशील याचं शिक्षण देणारी शिक्षणपद्धती. केवळ नोकर्या शोधणारा होऊ नकोस, तर नोकर्या निर्माण करणारा व बनवणारी. स्वयंरोजगार ते उद्योजकतेचा विकास.

याखेरीज मराठी भाषेचंही संवर्धन झालं पाहिजे. लोकसभा निवडणुकांच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला, ही बाब स्वागतार्ह आहे. पण केवळ केंद्रानं अभिजात दर्जा दिल्यानं मराठी भाषेचा आणि मराठी माणसाचा विकास होणार नाही. मराठी भाषेत मुळातून काम होईल, नवं ज्ञान निर्माण होईल, संशोधन होईल आणि मुख्य म्हणजे मराठी माणूस जेव्हा जीवनाच्या सर्व क्षेत्रात कर्तृत्व करेल तेव्हा मराठी ही लोकभाषा होईल. यासाठी सरकारची भूमिका महत्त्वाची आहे.

शेवटचा मुद्दा म्हणजे, महाराष्ट्राला साधावयाचा विकास, राज्य सरकारने प्रस्तावित केलेल्या योजना यांविषयी बोलताना अनेकदा राज्यावरील कर्जाच्या बोजाचा आणि सरकारी तिजोरीचा मुद्दा मांडला जातो. पण एक मूलभूत गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे हा आर्थिक विकास साधण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. यासाठी आर्थिक व्यवस्थापन कौशल्यानं करावं लागेल. देशात आर्थिक शिस्तीसाठी फिस्कल रिस्पॉन्सिबलिटी अँड बजेट मॅनेजमेंट ॲक्ट असा कायदा असून तो राज्यांसाठी बंधनकारक आहे. त्याचा भंग करता येत नाही. सार्वजनिक कर्ज घेताना या कायद्याची मर्यादा पाळावी लागेल. तसेच राज्याच्या जीडीपीच्या अडीच टक्क्यांपेक्षा कमी तूट असावी अशी तरतूद या कायद्यात आहे, तिचेही पालन करावेच लागेल.

या सर्व चौकटीत राहूनही अपेक्षित आर्थिक विकास घडवून आणणे आव्हानात्मक असले तरी ते निश्चित शक्य आहे. विकासाला चालना देणारा निधी कसा उपलब्ध करता येईल, हे आव्हान असलं तरी ते पेलण्याची क्षमता महाराष्ट्राकडे आहे आणि मुख्यमंत्रिपदी असणार्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या क्षमतांच्या आधारे विकासाला चालना देण्याचे कौशल्यही आहे.

# राज्यस्तरीय एमएसडीसी परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पटकावली तब्बल सोळा पारितोषीके कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

लातूर :– भारतीय दंत परिषदेच्या (खऊ–) वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय '६३ महाराष्ट्र स्टेट डेंटल कॉन्फ्रन्स २०२४' मध्ये लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील दंत शाखेतील विविध विभागातील एम. डी. एस. पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व प्राध्यपकांनी सादर केलेल्या पेपर व पोस्टर्स सादरीकरणास अनुक्रमे प्रथम, व्दितीय अशी तब्बल १६ पारितोषिक मिळाली आहेत. विजेते विद्यार्थी व प्राध्यापकांना कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते सत्कार करुन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, बाल दंत रोग तज्ञ डॉ. योगेश काळे, मुख शल्य तज्ञ डॉ. अमोल डोईफोडे, विभाग प्रमुख डॉ. सुसेन गांजरे, डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. प्रवीण कुमार मरुरे, डॉ. विजयालक्ष्मी माले हे उपस्थित होते. भारतीय दंत परिषदेच्या (खऊ–) नांदेड शाखेच्या वतीने नांदेड येथे दि. २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधित संपन्न झालेल्या राज्यस्तरीय एमएसडीसी परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील दंत परिवेष्ठन शास्त्र विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. ऋतुजा शिवपुरकर यांनी 'स्क्रु रिटेन्ड व्हर्सेस सिमेंट रिटेन्ड इम्प्लॅन्ट सपोर्टेड फिक्सड



डेंटल प्रोस्थेसिस' या विषयावर तर डॉ. प्रतिक्षा लाटे यांनी 'गाईडेड इम्प्लॅन्ट सर्जरी' या विषयावर सादर केलेल्या पोस्टर सादरीकरणास प्रथम पारितोषीक मिळाले आहे. तसेच 'सॉकेट शिल्ड टेक्निक' या विषयावर डॉ. स्नेहल जाधव तर 'ट्रिटमेंट ऑफ इम्पॅक्टेड प्रिमोलर' या विषयावर डॉ. प्रतिक्षा लाटे डॉ. यांनी सादर केलेल्या पेपर सादरीकरणास प्रथम पारितोषीक मिळाले आहे. कृत्रिम दंत रोपन विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. अव्दैता आवाळे यांच्या 'हॅालो बल्प ऑप्च्युरेटर' या विषयावरील पेपर सादरीकरणास प्रथम तर डॉ. स्वेता मिश्रा यांच्या 'लॅमिनेट विनिअर' सादरीकरणास द्वितीय पारितोषिक मिळाले आहे. त्याचबरोबर 'स्प्लिट डेंचर' या विषयावर डॉ. योगीनी शेंडे यांच्या पोस्टर सादरीकरणास प्रथम पारितोषीक मिळाले. यासाठी विभाग प्रमुख डॉ. सुशेन गाजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शिरीष पवार, डॉ. शितल वाघ यांनी मार्गदर्शन केले. मुख शल्य विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षातील विद्यार्थी डॉ. ऋत्विक खांडरे यांच्या 'सुपरेटिव ऑस्टीओमालायटीस' या विषयावरील पेपर सादरीकरणास प्रथम तर व्दितीय वर्षातील डॉ. अंजली वशिष्ठ यांनी 'कम्प्युटर एडेड रिकंट्रक्शन' या विषयावरील पेपर सादरीकरणास व्दितीय पारितोषीक मिळाले आहे. यासाठी विभाग प्रमुख डॉ. शिराज बादल, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. गोविंद चांगुले, डॉ. पुनम फड, डॉ. गोपाळ नागरगोजे, डॉ. व्यंकटेश हंगे यांचे मार्गदर्शन लाभले. ऑर्थोडॉंटिक विभागातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाचे तृतीय वर्षातील विद्यार्थी डॉ. आवेश भोईर यांनी 'एक्सट्रुजन ऑफ ऑर्थोडॉंटिक्स टुथ' या विषयावर तर डॉ. मंजुषा पाटील यांनी 'ऑक्सट्रक्टिव स्पि कनिया' या विषयावरील पेपर सादरीकरणास प्रथम तर डॉ. सिध्दांत जाधव यांच्या 'क्युरो गाईड' या विषयावरील पेपर सादरीकरणास द्वितीय पारितोषिक मिळाले आहे. यासाठी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण कुमार मरुरे, डॉ. शिल्पा बिक्कड, डॉ. सुजित झाडके यांनी मार्गदर्शन केले. बाल दंत रोग विभागातील सिनियर लेक्चरर डॉ. प्राजक्ता गायकवाड व मुख औषधशास्त्र व क्ष – किरण शास्त्र विभागातील सिनियर लेक्चरर डॉ. सायोज्यता बांगर यांनी सादर केलेलल्या 'हर्नेसिंग प्लासमिड टेक्नॉलॉजी: इन जिन क्टीवेशन इन डेंटल प्लिकेशन' या विषयावरील पोस्टर सादरीकरणास प्रथम पारितोषीक तर डॉ. सायोज्यता बांगर व डॉ. प्राजक्ता गायकवाड यांच्या 'टोबॅको अवेरनेस ऑन ओरल हेल्थ' या विषयावरील पेपर सादरीकरणास प्रथम पारितोषीक मिळाले आहे. या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थी व प्राध्यापकांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

## वीज वाहिनी दुरुस्तीसाठी रविवारी मनपाचा पाणीपुरवठा बंद राहणार

लातूर/ प्रतिनिधी :– वीज वाहिनीची दुरुस्ती करण्यासाठी रविवार दि.०८ डिसेंबर रोजी दिवसभर पाणीपुरवठा बंद राहणार असल्याची माहिती महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली. हरंगुळ येथील वीज वाहिनी दुरुस्ती काम करणेसाठी महावितरण मार्फत विद्युत पुरवठा बंद राहणार असल्यामूळे रविवार दि. ०८ डिसेंबर रोजी शहरात पाणीपुरवठा बंद राहणार असून नागरिकांनी सहकार्य करावे,असे आवाहन मनपा पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

## लहान मुलांच्या नाश्त्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये बनवा आलू मटार टिक्की, वाचा सोपी रेसिपी

सकाळच्या वेळी मुलांना नाश्त्यामध्ये आणि डब्यात खायला काय द्यावं? हा प्रश्न सर्वच पालकांना नेहमी पडतो. अशावेळी तुम्ही मुलांना नाश्त्यामध्ये पौष्टिक आणि हेल्दी पदार्थ खाण्यास देऊ शकता. नाश्त्यामध्ये पौष्टिक पदार्थ खायला दिल्यामुळे मुलांच्या शरीराचा विकास होतो. शिवाय साथीच्या आजरांपासून शरीर निरोगी राहते. काहींना सतत बाहेरचे तेलकट आणि तिखट पदार्थ खाण्याची सवय असते. पण सतत तेलकट आणि बाहेरच्या पदार्थांचे सेवन केल्यामुळे लहान मुलांचे आरोग्य बिघडू शकते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला लहान मुलांच्या नाश्त्यासाठी आणि डब्यासाठी आलू मटार टिक्की बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. ही रेसिपी कमीत कमी वेळात झटपट तयार होते. घाईगडबडीमध्ये सुद्धा तुम्ही हा पदार्थ बनवू शकता.

सकाळच्या वेळी पोटभर नाश्ता करणे आवश्यक आहे. नाश्ता केल्यामुळे पोट भरलेले राहते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. नाश्ता करणं ही आरोग्यदायी सवय असून नाश्ता केल्यामुळे संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहात जातो. पण अनेक लोक सकाळच्या वेळी नाश्ता करणं टाळतात. असे केल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. चला तर जाणून घेऊया आलू मटार बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
मटार
उकडलेला बटाटा
कॉर्नफ्लोअर
मीठ
कोथिंबीर
हिरवी मिरची आलं लसूण पेस्ट
चाट मसाला
लाल तिखट
चवीनुसार साखर
जिरे पावडर
आमचूर पावडर

कृती:
आलू मटार टिक्की बनवण्यासाठी सर्वप्रथम ओले वाटणे आणि बटाटा कुकरमधून उकडवून थंड करून घ्या.



मटार आणि बटाटा उकडवून थंड झाल्यानंतर बाऊलमध्ये घेऊन मॅश करून घ्या. त्यानंतर त्यात हिरवी मिरची आलं लसूण पेस्ट, लाल तिखट, हळद, जिरे पावडर आणि चवीनुसार मीठ टाकून मिक्स करून घ्या. त्यानंतर त्यात चाट मसाला, चवीनुसार साखर, एंचिर पावडर, कोथिंबीर टाकून मिक्स करून घ्या. सगळ्यात शेवटी कॉर्नफ्लोअर टाकून तुम्हाला हव्या त्या आकाराच्या टिक्की बनवा. पॅनमध्ये तेल गरम करण्यासाठी ठेवा. गरम तेलात तयार केलेली टिक्की दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली आलू मटार टिक्की. हा पदार्थ तुम्ही सॉस किंवा हिरव्या चटणीसोबत खाऊ शकता.

## या भाज्या खाल्ल्यामुळे झटपट कमी होईल वजन, आजच आहारात करा समावेश, टॉयलेटमध्ये बसताच पोट होईल साफ

हिवाळा ऋतू सुरु झाला आहे. थंडीत शरीराला पोषक तत्वे मिळवून देण्यासाठी आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य आहार फार महत्त्वाचा ठरतो. इतर ऋतुंपेक्षा थंडीच्या ऋतूमध्ये वजन कमी करणे अधिक सोपे ठरते. या ऋतूत तुम्ही भरपूर व्यायाम करून आणि स्वस्तात मिळणाऱ्या भाज्यांचे सेवन करून आपले वाढलेले वजन क्षणार्धात कमी करू शकता. आपल्याला कितीही भाज्या आवडत नसल्या तरी भाज्यांचे सेवन हे आपल्या आरोग्यासाठी फार फायद्याचे असते, ज्यामुळे आहारात आवर्जून भाज्यांचे सेवन करावे.



भाज्यांमध्ये फार कमी कॅलरीज असतात, सोबतच यात खूप सारे पोषक घटक असतात जे आपल्या शरीराला निरोगी ठेवण्यास आणि पटकन वजन कमी करण्यास मदत करत असतात. यामुळे शरीराला उष्णताही मिळते. आज आम्ही तुम्हाला या लेखात अशा काही भाज्या सांगणार आहोत, ज्यांचे सेवन करून तुम्ही क्षणार्धात तुमचे वाढलेले वजन कमी करू शकता.

पालक

पालक ही भाजी फार कमी कॅलरीजमध्ये अधिक पोषकद्रव्ये मिळवून देते, ज्यामुळे हीच आवर्जून आहारात समावेश करावा. थंडीत याचे सेवन फायद्याचे ठरू शकते. यात भरपूर प्रमाणात लोह, कॅल्शियम आणि फायबर असते. हे पदार्थ आपल्या शरीराला ऊर्जा मिळवून देण्यास आणि आपले वजन कमी करण्यास मदत करतात. शशिवाय पालकमध्ये असलेले अँटी–ऑक्सिडंट्स शरीरातील हानिकारक घटक दूर करतात.

कोबी

कोबी ही देखील एक अशी भाजी आहे फायबर, पोटॅशियम आणि कॅलरीज भरपूर प्रमाणात आढळल्या जातात. कोबीपासून भाजीच नव्हे तर इतरही अनेक पदार्थ बनवले जातात जसे की, कोबी मांचुरियन, कोबी पराठा, कोबी सूप इ. वजन कमी करण्यासही याची फार मदत होत असते. थंडीत उत्तम आरोग्य ठेवण्यासाठी तुम्ही आपल्या आहारात कोबीचा समावेश करू शकता.

लाल भोपळा

लाल भोपळा हा अनेकांना खायला तितकासा आवडत नाही मात्र यातही अनेक पोषक घटक आढळले जातात, जे आपल्या आरोग्यासाठी फायद्याचे ठरत असतात. लाल भोपळ्यात कॅलरीज फार कमी असतात शिवाय यात व्हिटॅमिन –, उ, घ आणि भरपूर पोटॅशियम, मॅग्नेशियम व लोह यांसारखे मिनरल्स आढळतात. हे शरीर मजबूत करण्यास आणि वाढलेली चरबी कमी करण्यास मदत करते.

मुळा

थंडीच्या दिवसांत मुळ्याचे विशेष करून सेवन करावे. ही एक उष्णतादायक भाजी आहे. यामध्ये मुबलक प्रमाणात फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असल्याने पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. नियमित याचे सेवन केल्याने शरीरातील विषारी किंवा घातक पदार्थ बाहेर फेकले जातात. तुम्ही मुळ्याची भाजी किंवा पराठे तयार करून याचा आपल्या आहारात समावेश करू शकता.

## फक्त अन्न गरम करणेच नव्हे तर 'या' गोष्टींसाठीही होतो मायक्रोवेव्ह ओव्हनचा फायदा

मायक्रोवेव्ह ओव्हन हे आधुनिक तंत्रज्ञानाचा एक भाग असून, स्वयंपाकघरातील कामासाठी अत्यंत उपयुक्त साधन ठरले आहे. हे साधन अगदी कमी वेळात अन्न गरम करण्यासाठी, शिजवण्यासाठी आणि बेक करण्यासाठी उपयुक्त आहे. मायक्रोवेव्ह ओव्हनचा सर्वात मोठा फायदा म्हणजे यात अन्न जळण्याची शक्यता खूपच कमी असते. विशेषतः लोणी, फॅट, चॉकलेट किंवा दलिया यासारखे पदार्थ सहज आणि जलद पद्धतीने गरम होतात, जे पॅनमध्ये गरम करताना गाठी होण्याची किंवा जळण्याची शक्यता असते. आजकालच्या पिढीमध्ये मायक्रोवेव्ह ओव्हन वापरण्याचे प्रमाण अफाट आहे.

अन्न गरम करण्यासाठी उपयुक्त

मायक्रोवेव्हचा उपयोग केवळ अन्न गरम करण्यासाठीच नव्हे तर विविध प्रकारचे पदार्थ तयार करण्यासाठी देखील होतो. गार्लिक ब्रेड बनवणे, भाज्या किंवा अन्नपदार्थ गरम करणे हे मायक्रोवेव्हमध्ये अगदी सोप्या पद्धतीने करता येते. पारंपरिक गॅस शेगडीवर अन्न तयार करण्यासाठी लागणारा वेळ मायक्रोवेव्हमध्ये खूपच कमी लागतो. त्यामुळे काम सोपे होते आणि वेळेची बचतही होते.

ग्रिलिंग, वाफवणे आणि उकळणे

मायक्रोवेव्ह ओव्हनचा उपयोग फक्त गरम करण्यापुरता मर्यादित नसतो. त्याचा उपयोग ग्रिलिंग, उकळणे आणि वाफवणे यांसाठीही केला जातो. भाज्या वाफवून शिजवण्यासाठी किंवा फळे उकळण्यासाठी मायक्रोवेव्हचा वापर केल्याने पोषकतत्त्वे टिकून राहतात. त्यामुळे आरोग्यासाठीही हा पर्याय उपयुक्त ठरतो.

ब्लँचिंगसाठी आधुनिक पर्याय

फळे आणि भाज्या ब्लँच करण्यासाठी मायक्रोवेव्ह हा पारंपरिक पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी आहे. कमी वेळेत अधिक चांगल्या दर्जाचे ब्लँचिंग मायक्रोवेव्हमध्ये करता येते. शिवाय, ब्लँचिंग



दरम्यान अन्नातील पोषकतत्त्वेही टिकून राहतात.

मायक्रोवेव्हचा उपयोग केक आणि ब्रेड बेक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. पारंपरिक पद्धतीपेक्षा मायक्रोवेव्हमध्ये बेकिंग प्रक्रिया जलद होते. मायक्रोवेव्हमध्ये तयार केलेले केक आणि ब्रेड स्वादिष्ट आणि नरम असतात.

डीफ्रॉस्ट करण्यासाठी आणि उकळण्यासाठी

मायक्रोवेव्ह ओव्हन जमी झालेल्या अन्नपदार्थांचे डीफ्रॉस्टिंग प्रभावीपणे करते. यात अन्नाचे पोषणमूल्य आणि मूळ संरचना कायम राहतात. याशिवाय, अन्न उकळण्यासाठीही मायक्रोवेव्हचा वापर केला जातो. काही मिनिटांतच भाजीपाला किंवा इतर अन्नपदार्थ व्यवस्थित उकळले जातात.

## युवकांना कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली तर नक्कीच बाबासाहेबांचे आधोरे स्वप्न साकार करतील..! कल्याणराव हनवते ( बौद्धाचार्य )






आजची मुले सद्या मोबाईलच्या जास्तच अहारी गेल्याने अभ्यास आणि इतिहास वाचनाची गोडी त्यांच्यात राहीली नसल्यामुळे उद्याच्या उज्वल देशाचे भविष्य धोक्यात आले आहे आणि म्हणून मुलांवर बुद्ध– फुले– शाहू– आंबेडकर यांचे विचार रूजविणे व त्यांच्यावर चांगले संस्कार देणे हे आपले अध्यकर्तव्य समजून युवकांना कार्यात संधी उपलब्ध करून दिली तर बाबासाहेबांच्या रथाला आधीक जोमाने पुढे नेहतील..!

नवी मुंबई / के. एच. हनवते : भिमरत्न युवा संघ नेरूळ नवी मुंबई यांच्या वतीने महामानव बौधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी ६ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ८ वाजता विनम्र अभिवादन करण्यात आले त्यावेळी स्थानिक बौद्ध उपासक/ उपासीका व लहान थोर बालक बालीका यांनी उपस्थित राहून आपले आदर्श तथागत भगवंत गौतम बुद्ध– महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले, सर्व प्रथम विधीवत बुद्ध वंदना बौध्दाचार्य : कल्याणराव हनवते यांनी घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली, त्यावेळी त्यांनी वरील उदगार काढून महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन केले.

## रात्री बेडवर जाण्यापूर्वी हे १ पान खा, पोटातील सडलेली घाण निघेल त्वरीत बाहेर, सद्गुरुंनी सांगितले चमत्कारीक फायदे

आपल्या आयुर्वेदातील काही साध्या गोष्टी इतक्या फायदेशीर आहेत की त्या मोठ्या आजारांनाही जवळ येऊ देत नाहीत. सुपारी हे असेच एक औषध आहे ज्याचे सेवन आता लोकांनी कमी केले आहे. त्याचे काही चमत्कारिक फायदे सद्गुरूंनी सांगितले आहेत. खाण्याच्या पानाचे अनेक वैज्ञानिक संशोधने देखील केली गेली आहेत ज्यात त्याच्या अनेक औषधी गुणधर्मांचा शोध घेण्यात आला आहे.





छउइख च्या शोधनिबंधात असे आढळून आले आहे की पानांमध्ये अँटी–बॅक्टेरियल, अँटी–फंगल, अँटीऑक्सिडंट्स आणि अँटीबायोटिक गुणधर्म असतात. सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्या म्हणण्यानुसार पानावर केलेल्या वैज्ञानिक संशोधनापेक्षा जास्त गुणधर्म आहेत. त्यांनी सांगितले की, देवाला हे पान असंच अर्पण केले जात नाही. त्यातील चांगले गुणधर्म शरीसाठी उपयुक्त ठरतात.

सद्गुरुंनी सांगितले की पान वेगवेगळ्या प्रकारे त्यात इतर गोष्टी मिसळून खाल्ले जाते. पण रात्री झोपण्यापूर्वी हे पान खाल्ल्यास पोटाला त्याचा सर्वाधिक फायदा होईल. चला जाणून घेऊया रात्री झोपण्यापूर्वी पान खाण्याचे कोणते फायदे आहेत

तोंडापासूनच पानाचे फायदे

सद्गुरुंनी सांगितले की पानाचे फायदे तोंडापासून सुरू होतात. हे अँटी–बॅक्टेरियल आहे ज्यामुळे तोंडातील बॅक्टेरिया किंवा बुरशीचे सेवन करताच मरायला सुरुवात होते. त्याच वेळी, ते तोंडाला सुगंधित करते ज्यामुळे इतर हानिकारक गोष्टी देखील तोंडात जात नाहीत. तोंडात आणि जिभेवर व्रण असतील तर ते बरे होतात. मात्र, यासाठी पानात अत्यंत कमी चुना वापरला जातो अन्यथा जीभ कापण्याची भीती असते.

आम्लनाशक पान

सद्गुरूंच्या मते, खाण्याच्या पानात अँटासिड आहे. म्हणजेच ते शरीरातील विष काढून टाकते. हे साप चावल्यानंतर तयार होणारे विष देखील काढून टाकते. जरी हे सापाचे विष काढण्याचे काम पूर्णपणे करू शकत नाही, परंतु काही प्रमाणात ते विष निश्चितपणे साफ करते. पोटात जास्त प्रमाणात ॲसिड तयार होत असेल तर ते कमी होते.

नसांना मिळते उत्तेजना

सद्गुरु म्हणतात की खाण्याची पाने उत्तेजक असतात. विशेषत: त्यात सुपारी घातली तर ती खूप उत्तेजक बनते. त्यात न्यूरोलॉजिकल उत्तेजक गुणधर्म आहेत. म्हणजेच ते नसांमध्ये ताजेपणा भरण्याचे काम ते करते. यामुळे मज्ञातंतूंमध्ये ताजेपणा येतो. शिरांमध्ये ताजेपणा आला की ते संपूर्ण शरीरात चैतन्य भरते आणि तुम्ही फ्रेश राहता

पोट साफ करण्यासाठी रामबाण उपाय

रात्री पान खाण्याचा सर्वात मोठा फायदा हा आहे की यामुळे तुमचे पोट साफ होईल. बद्धकोष्ठतेची समस्या कितीही गंभीर असली तरी पान व्यवस्थित लावून सेवन केल्यास बद्धकोष्ठता काही दिवसातच बरी होते. सुपारीच्या पानामुळे पोटातील चांगले बॅक्टेरिया वाढतात. त्यामुळे पचनसंस्था मोठ्या प्रमाणात मजबूत होते. यामुळे गॅस, सिडिटी, ब्लोटिंगसारख्या समस्या दूर होतात.

बॅक्टेरियाचा सर्वात मोठा शत्रू

डाऊन टू अर्थने संशोधनाचा हवाला देत म्हटले आहे की पाने ई. कोलाय आणि स्यूडोमोनास इत्यादी ग्रॅम नकारात्मक जीवाणू नष्ट करतात.

# मांजरी माथाची खडतर वाटेची पायपीट संपवण्यासाठी प्रशासन लागले कामाला,

## आदिवासी विकास विभाग सकारात्मक

### वनविभाग सकारात्मक भूमिकेत

जंगल भागातून हिंस्त्र प्राण्यांचा सामना करत वाट शोधणाऱ्या मांजरी माथा– वासीयांची रस्त्याची परवड पाहता वन विभाग सकारात्मक भूमिकेत असून तशी पुष्टी अप्पारपेठचे वनक्षेत्रपाल उमेश ढगे यांनी दिली. त्यातच आता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहा. जिल्हाधिकारी मेघना कावली ह्या रस्त्याच्या कामाला निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात असल्याचे त्यांनी पत्रकारशी बोलताना सांगितले आहे. प्रकल्प अधिकारी मेघना कावली यांची मांजरी माथासाठीची धडपड पाहता गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहे.



किनवट/शेख शौकत :– जवळपास ७० वर्षांपूर्वी डोंगर माथ्यावर वसलेल्या मांजरी माथा या ३५० लोकसंख्येच्या गावाला अजूनही पक्का रस्ताच मिळाला नाही. घाट रस्ता दगड धोंडे तुडवत खडतर पाऊल वाटेने पायपीट करत घाटातून वाट शोधण्याची वेळ मांजरी माथाच्या ग्रामस्थांना पाचवीलाच पूजली आहे. रस्ते विकास जोरात सुरू असताना मांजरी माथावासीय दळणवळणापासून आजही कोसोदूर आहेत. जलधरापासून चार किलोमीटर अंतरावर डोंगरमाथ्यावर मांजरी माथा ही वस्ती १९५५ साली वसली. जवळपास १०० एकरी वन पट्टेदार असून ही वस्ती दुर्लक्षित आहे. रस्ताच नसल्याने पिकवलेला शेतमाल आजही डोक्यावर आणून जलधरा व इतर ठिकाणी नेऊन विकावा लागत आहे. १२० घरांची वस्ती ३५० लोकसंख्या असलेल्या मांजरी माथा गावाला अजूनही पक्का रस्ता मिळाला नाही. पाऊलवाटेने पायपीट करत खडतर मार्गाने ये–जा करावी लागत आहे. एखादा माणूस जर आजारी पडला किंवा एखादी गर्भवती महिला प्रसूतीसाठी दवाखान्यात न्यायचे झाल्यास झोळी करून किंवा बाजीवर टाकून नेण्याची वेळ आजही येत आहे. रस्त्याच्या अभावी १५ ते २० जणांना आजपर्यंत वाटेतच जीव गमवावा लागल्याचे गावकरी बोलत आहेत. हिवाळ्यात विहिरीतून भागविली जाते तहान मांजरीमाथा वस्ती जलधरा ९ ग्रामपंचायतीच्या हद्दीत वसली तेव्हा पावसाळा, हिवाळ्यात छोटे नाले व छोट्या खोदलेल्या विहिरीतून पाणी पिऊन तहान भागविली जात असे. पण उन्हाळ्याचे चार महिने मात्र तीन किलोमीटर पायपीट करून पाटबंधारे विभागाच्या जलधरा लघु प्रकल्पातून डोक्यावर घागर हंडा घेऊन पायपीट करून पाणी मिळवावे लागत होते. टीचभर पोटाची खळगी भरण्याबरोबर उन्हाळ्यात घागरभर पाणी मिळवण्यासाठी वनवन पाण्यासाठी फिरावे लागत होते. पण मधल्या काळात लाईट आली. पाणी पुरवठा नळयोजना झाली आता फक्त आवश्यकता आहे ती पक्क्या रस्त्याची.

# जल, जंगल, जमीन आपल्या समाजाचे मूलाधार – डॉ. अविनाश कदम

लातूर :– डॉ. अविनाश कदम*, संचालक, भूशास्त्र संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड यांनी हरिती बुक गॅलरी, लातूर येथे सदिच्छा भेट दिली व विविध वाचन, लेखन आणि विविध सामाजिक उपक्रमात सहभागी मित्राशी संवाद साधला. लातूर जिल्ह्यातील हरिती वाचन लेखन उपक्रमाविषयक अनिल जायभाये यांनी त्यांना माहिती दिली. सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींची ओळख झाल्यानंतर डॉ. अविनाश कदम यांनी आपले मनोगत आणि संवाद उपस्थिताशी साधला. ज्यामध्ये त्यांनी एकूण जल, जंगल, जमीन आणि पाणी याविषयीं महत्वाच्या नोंदी त्यांनी सांगितल्या. एकूण मराठवाडा, दुष्काळ पाणी व्यवस्थापन ते पीक, शेती आणि शेती पूरक जोडधंदे, ग्रामीण भागातील उत्पादकता कशी वाढवता येईल. अशा विविध विषयांवर चर्चा केली. एकूण भूगोल ह्या ज्ञानशाखेच महत्व आपण कोणतंही संशोधन करत असतांना लक्षात घ्यावं लागत. ती दृष्टी आपणास महत्वाची आहे हे त्यांनी अधोरेखित केले. डॉ. कदम सरांचं स्वागत डॉ. बी. आर. पाटील यांनी केल. सदर चर्चेत डॉ. अशोक नारनवरे,



श्री. सुपर्ण जगताप, राहुल लोंढे, डॉ. निशिकांत वारभुवन, ॲड. कांबळे, अनिल जायभाये, मधुकर सोनवणे, विकास देवर्जनकर इत्यादी उपस्थित होते. संवादाचे आयोजक हरिती बुक गॅलरी, लातूर वृक्ष चळवळ, सह्याद्री देवराई, लातूर यांनी केले होते.

# बुद्ध विहारात वैज्ञानिक दृष्टिकोनातून चर्चा व्हावी. मेश्राम बी. बी.

## ७७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर २०२४ ला त्रिरत्न बुद्ध विहार, भारतमातानगर, एन–१२, हडको येथे ७७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटन पर मार्गदर्शन करताना बौद्धाचार्य व्ही. के. वाघ म्हणाले की, धम्म प्रचाराचा उपक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध असावे. दररोज विहारात गेले पाहिजे मात्र अपत्यावर बौद्ध संस्कार नसल्याने केवळ वृद्ध व्यक्ती विहारात येतात. लेखन, वाचनासह संभाषणाने वक्तृत्व कला विकसित होते. मंच उपलब्ध करून देणे हे महान कार्य आहे, जे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलने प्रत्यक्षात सुरू केले आहे. जो शीलवान तो बलवान म्हणून काया, वाचा, मनाने आपण शुद्ध झाले पाहिजे. बाह्य स्वरूपाचे आकलन पंच ज्ञानेंद्रियांने होत असले तरी अंतरंगात सुद्धता असायला हवी. शील, समाधी व प्रज्ञा या त्रिसूत्रीची मानवाला प्राथमिक गरज आहे.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, दर रविवारी बौद्धांनी विहारात गेलेच पाहिजे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश होता. आपण तो आदेश पाळत नसलो तर बाबासाहेबांचे नाव घ्यायचा आपणास काय अधिकार आहे? अधिकाराची पूर्तता करून घेण्यासाठी कर्तव्याचे पालन पण करावे लागत असते. गौरव दुधमले म्हणाले की, विहारात आल्याने मानसिक आजार कमी होऊ शकतात. एस. एस. वानखेडे म्हणाले की, व्यक्तीच्या आचरणावरून ती व्यक्ती बुद्ध आहे किंवा नाही हे ठरत असते. त्यांनी यावेळी, त्या भीम गौतमाला वंदन करुया। हे गीत सादर केले. भीमराज बोर्डे म्हणाले की, प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनाचा लेखक आहे. आपण जसे वर्तन करू तसेच घडेल.





कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दक्षिण भारतातील द्रविड व उत्तर भारतातील नाग लोक हे नागवंशीय लोक आहेत. म्हणून त्यांना संघटीत करण्यासाठी आम्ही दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) हे राष्ट्रीय संघटन चालवीत आहोत. २४ नोव्हेंबर १९५६ ला काशी विद्यापीठात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्यांच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्म सत्य आहे तर मग पंचज्ञानेंदियाद्वारे मिळालेले व विज्ञानाने शोधलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न उपस्थित करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून सत्याकडे वळण्याचा संदेश दिला होता. तसेच २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे असा आदेशयुक्त संदेश दिला होता. योग्य व सक्षम माणसे विहाराच्या व्यवस्थापनात आली तर अनिष्ट रूढी परंपरा नष्ट करण्यासाठी ते कार्य करू शकतील. परिणामी कब्जेधारी लोकांच्या ताब्यातून विहारे मुक्त होतील. ज्यामुळे विहारे ही चळवळीची संस्कार केंद्रे होतील. जनतेपर्यंत बुद्ध संदेश प्रचारीत करण्यासाठी होणाऱ्या संपर्क प्रक्रियेतील संवाद हे सुसंवादात परिवर्तित होण्याची आवश्यकता आहे. केवळ पुजा पाठ करून चालणार नाही तर बुद्ध समजून घेण्यासाठी आपण दर रविवारी बुद्ध विहारात गेलेच पाहिजे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. यावेळी 'बुद्ध धम्माचे प्रवचन बाई कालच आले मी ऐकून आणि देवारे दिले फेकून' हे गीत वसंत सुरडकर यांनी सादर केले.

या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, सम्यक रामटेके, गौरव दुधमले, वसंत सुरडकर, एस. एस. वानखेडे, इंजिनिअर किशोर पाटील, भीमराज बोर्डे इत्यादी उपासक उपस्थित होते.

# अजित पवार यांच्या संपत्तीवरील टाच सैल

मुंबई : वृत्तसंस्था उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मालमत्तेवरील टाच आयकर विभागाने सैल केली. अजित पवारांची जप्त करण्यात आलेली मालमत्ता आयकर विभागाने परत केली आहे. त्यामुळे सर्वांच्या भूवया उंचावल्या आहेत. प्राधिकरणाने निष्कर्ष काढला आहे कि, या कंपन्या व त्यातील बेनामी आर्थिक व्यवहारांचा कोणताही फायदा थेट अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांना झाला हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा आयकर विभागाने सादर केलेला नाही. तसेच बेनामी संपत्तीसाठी पैसेही सुनेत्रा पवार किंवा अजित पवार यांनी दिले आहेत हे आयकर विभागाने सिद्ध केलेले नाही, असं प्राधिकरणाने म्हटलं आहे. त्यामुळे संपत्ती टाच करण्याचे आदेश दिले जाऊ शकत नाहीत, असं प्राधिकरणाने म्हटलं आहे. निबोध, प्रतुर्ण, अपरिमेय या तीन कंपन्यांमार्फत नरिमन पॉईंट येथील निर्मल बिल्डिंगमध्ये १३ जून २०१४ रोजी जागा विकत घेण्यात आली होती. आयकर विभागाने केलेल्या छापेमारीत ही जागा 'बेनामी' संपत्ती असल्याचे निदर्शनास आले. निबोध, प्रतुर्ण, अपरिमेय या कंपन्या प्रत्यक्षात कोणताही व्यवसाय करत नव्हत्या. निबोध, प्रतुर्ण आणि अपरीमेय या कंपन्यांचे शेअर्स जय ॲग्रोटेक (आता स्पार्कलिंग सॉइल प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाते), कल्पवृक्ष वृक्षारोपण प्रा. लि. या कंपन्यांना ट्रान्सफर करण्यात आले. सगळ्या कंपन्या अजित पवार, पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांच्याच नियंत्रणात होत्या, तर मोहन पाटील व नीता पाटील 'डमी' असल्याचा आयकर विभागाचा निष्कर्ष आहे. अमिकोॲग्री, सु–तारा ॲग्रो, एफपी रिॲलिटी (अजित पवार, पार्थ पवार व साहिल प्रधान संचालक आहेत) या कंपन्यांचे नोंदणीकृत पत्ते अनंता मर्क्स (पार्थ पवार पार्टनर) कंपनीचे आहेत त्यातून या सर्व कंपन्या अजित पवार आणि पार्थ पवार यांच्यासाठी चालवल्या जात असल्याचा निष्कर्ष आयकर विभागाने काढला आहे.

# ज्या महिलांकडे स्मार्ट कार्ड बस पास असेल त्यांनाच १ जानेवारी २०२५ पासून मोफत प्रवास करता येईल असे मनपा प्रशासनाचे आव्हान

लातूर :– ज्या महिलांकडे स्मार्ट कार्ड बस पास असेल त्यांनाच १ जानेवारी २०२५ पासून मोफत प्रवास करता येईल असे मनपा प्रशासनाचे आव्हान लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने लातूर शहरातील महिलांसाठी मागील ३ वर्षापासून मोफत सिटीबस प्रवास सेवा सुरू आहे.या योजनेचा महिलांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे.अशी सेवा देणारे लातूर हे देशातील एकमेव शहर असल्याचे बोलले जात आहे.





लातूर शहर महानरपालिका प्रशासनाने नव्याने शहर बस पास स्मार्ट कार्ड योजना चालू करण्यात आली आहे. या करिता महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत गंजगोलाई शहर बस स्टॉप व क्रीडा संकुल शहर बसस्टॉप येथे देऊन आपले रजिस्ट्रेशन करून घ्यावे. दहा दिवसानंतर त्याच ठिकाण येथून स्मार्ट कार्ड मिळवता येईल.ज्या महिलांकडे स्मार्ट कार्ड बस पास असेल त्यांनाच १ जानेवारी २०२५ पासून मोफत प्रवास करता येईल असे मनपा प्रशासनाने घोषित केलेले आहे.

# महात्मा बसवेश्वर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सहसंचालक डॉ किरणकुमार बोंदर यांच्या हस्ते विनम्र अभिवादन

लातूर / प्रतिनिधी :– येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक कार्यालय नांदेडचे सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. यावेळी श्री. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे ,ज्येष्ठ संचालक श्री राजेश्वर बुके, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, प्राचार्य डॉ. संजय गवई. डॉ. सी. के. हारनाळे, डॉ. मोहन रोडे, डॉ. बालाजी डाकोरे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.संजय पवार , पर्यवेक्षिका प्रा.वनिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. वाणिज्य शाखा समन्वयक डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. मंतोष स्वामी, डॉ. जितेंद्र देशमुख, हिंदी विभागप्रमुख डॉ. मनोहर चपळे, मराठी प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, कार्यालयीन प्रमुख श्री नामदेव बेंदरगे, श्री रत्नेश्वर स्वामी, श्री विनायक लोमटे ,श्री महादेव स्वामी यांची उपस्थिती होती. यावेळी श्री नामदेव बेंदरगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट सांगितला .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी महापुरुषांचे विचार आचरणात आणले पाहिजेत तरच समाजाची उन्नती होईल असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्टाफ सेक्रेटरी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. धोंडीबा भुरेयांनीमानले.





# जनतंत्राची जागा धनतंत्राने घेतल्याने लोकशाही धोक्यात आली आहे. – प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांचे प्रतिपादन

लातूर :– समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय म्हणजे आंबेडकरी विचारधारा होय. अखिल मानव जातीच्या उद्धाराचा मंत्र आंबेडकरीने चळवळीने दिला आहे. लोकशाहीचा पाया आंबेडकरी विचारधारेत आहे. परंतु आज भारतात लोकशाही ऐवजी पक्षशाही, घराणेशाही आणि भांडवलशाहीने राजसत्तेवर कब्जा घेतल्यामुळे भारतात जनतंत्राची जागा धनतंत्राने घेतली आहे. त्यामुळे लोकशाहीलाच धोका निर्माण झाला आहे. हेच फार मोठे हवाहन आंबेडकरी चळवळीपुढे उभे राहिले असून श्रमशक्ती आणि युवाशक्तीच्या एकत्रीकरणातून हे आव्हान आपण पेलू शकू असे प्रतिपादन सुप्रसिध्द वक्ते प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले आहे.

लातूर येथील सरस्वती विद्यालयात ' लसाकम ' कास्ट्राईब कर्मचारी महासंघ आणि ' जी – २४ ' या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीदिनानिमीत प्रकाशनगरमधील सरस्वती विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेत आंबेडकरी चळवळीपुढील आव्हाने आणि उपाय या विषयावर प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे बोलत होते. अध्यक्षस्थानी ' लसाकम ' चे जिल्हाध्यक्ष एकनाथ पलमटे होते. तर मंचावर आदिवासी नेते रामराजे आत्राम, ' लसाकम ' चे महासचिव राजकुमार नामवाड आणि कास्ट्राईब चे विभागीय अध्यक्ष जी.टी. होसूरकर प्रमुख अतिथी म्हणून विराजमान होते.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात प्राचार्य रोडे म्हणाले की, सामान्य माणसाच्या उद्धाराठी आणि प्रस्थापित पक्षाला पर्याय देण्यासाठी 'आरपीआय



' ची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली होती. पण आज आंबेडकरी चळवळीतील पुढारी प्रस्थापित पक्षांना पर्याय देण्याऐवजी प्रस्थापितांच्या छावणीत जाण्यासाठी धडपडत आहेत. प्रस्थापित पक्षाच्या मांडीवर बसून राजकारण करणाऱ्या दलित पुढाऱ्यांचे व्यक्तीगत फायदे होत असतीलही पण समाज आणि आंबेडकरी विचाराचे काय ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आंबेडकरी विचाराची प्रेरणा घेऊन साहित्य क्षेत्रात दलित साहित्याने जसे यशाचे शिखर गाठले तसे राजकीय अस्तीत्व निर्माण होऊ शकले नाही. म्हणून समविचारी पक्ष –संघटनांना सोबत घेऊन सर्व वंचित समाजाच्या एकत्रीकरणातून पुन्हा एकदा आंबेडकरी चळवळ उभी राहाण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगीतले.

यु.डी. गायकवाड यांनी गायीलेल्या भीमगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. नरसिंग घोडके यांनी प्रास्ताविक केले. श्रीकांत मुद्दे यांनी सूत्रसंचलन केले तर इंजि. श्रीधर शेवाळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास शहरातील बुध्दीजीवी वर्ग आणि कार्यकर्ते बहुसंस्थेने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE